**आदेश**

जा.क्र. २४८७ /कोरोना/मनाई/ आदेश/२०२०
पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड
दिनांक - २२/०३/२०२०

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दि.२२/०३/२०२० चे २१.०० ते दि.२३/०३/२०२० चे ०५.०० वा. चे दरम्यान संचारास मनाई आदेश**

ज्याअर्थी, जागतिक आरोग्य संघटनेने कोरोना विषाणुमुळे पसरत असलेला आजार हा साथीचा संसर्गजन्य आजार म्हणुन घोषित केला आहे. तसेच कोरोना विषाणुचा प्रसार भारतात, महाराष्ट्रात, पिंपरी चिंचवड शहरात गतीने पसरत आहे असे दिसुन येत आहे. तसेच राज्यशासनाने कोरोना विषाणु (कोविड-१९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथीचा रोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३/०३/२०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदींनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली तयार करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर परस्पर संपर्कामुळे या विषाणुचा संसर्ग व प्रसार होण्याची शक्यता लक्षात घेता मानवी जीविताला, आरोग्याला किंवा सुरक्षितेतला संकट उत्पन्न होऊ शकते याची माझी खात्री झालेली आहे. त्या अनुषंगाने सारासार विचार करून तातडीची प्रतिबंधक उपाययोजना करणेसाठी फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ मधील तरतुदींच्या अनुषंगाने स्थानिक निवासी, अभ्यागत, वारंवार कामानिमित्त पिंपरी चिंचवड आयुक्तालय हद्दीत प्रवेश करणारे यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी, संदिप बिष्णोई, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दि.०१/०४/१९७४ चे अधिसुचनेव्दारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये कोणत्याही व्यक्तीला पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातातील कोणत्याही रस्त्यावर, सार्वजनिक वाहतूकीचे रस्त्यावर, गल्लोगल्ली या ठिकाणी संचार, वाहतूक, फिरणे, उभे राहणे, थांबून राहणे, रेंगाळणे या सर्व कृत्यास मनाई करणारा आदेश **दि.२२/०३/२०२० चे २१.०० ते दि.२३/०३/२०२० चे ०५.०० वा. चे दरम्यान** लागू करीत आहे.

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणी शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहाय्यक पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरिकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर आदेश पोलीस, आरोग्य, अत्यावश्यक सेवा (उदा. वीज, पाणी पुरवठा, संपर्क, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्वाच्या पायाभूत विकासाशी संबंधित उद्योग- Critical National Infrastructure, अत्यावश्यक वस्तू व सेवा यांची वाहतूक, कोरोनो विषाणूचा संसर्ग व प्रसार टाळण्यासाठी कार्यरत संबंधित आपत्ती निवारण व्यवस्थापन या मधील अधिकारी व कर्मचारी तसेच माझ्यावतीने परवानगी दिलेल्या व्यक्ती यांना लागू नसतील. मात्र त्यांनी त्यासाठी त्यांचे ओळखपत्र व सदर विशेष कार्यासाठी नेमणूकीबाबतचे आदेश सोबत बाळगणे बंधनकारक असेल.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दि.२२/०३/२०२० रोजी दिलेला आहे.

पोलीस आयुक्त
पिंपरी चिंचवड

**(संदीप बिष्णोई)**
**पोलीस आयुक्त**
**पिंपरी चिंचवड**

**ठिकाण :- पिंपरी चिंचवड**
**दिनांक :- २२/०३/२०२०**

Scanned with CamScanner